माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार
## तक्रार क्रमांक : ४५/२०१९

**तक्रारकर्ता, श्री. पंढरी नामदेव बोरघरे,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
**ग्राम पंचायत कार्यालय, वढधा ता. आरमोरी, जि. गडचिरोली**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.)**
**पंचायत समिती, आरमोरी, ता. आरमोरी जि. गडचिरोली**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २९.०८.२०२४**

**तक्रारकर्ता** : अनुपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १४.११.२०१७ | --- | १५.०१.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) नुसार व्दितीय अपील क्र. १८९३/२०१७, दिनांक १४.११.२०१७ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २९.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत वडधा ता. आरमोरी जि. गडचिरोली श्री. विजय तुळशीराम गडपायले तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पुरुषोत्तम पंढरी हूड उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.) पंचायत समिती आरमोरी जि. गडचिरोली श्री. राजकुमार ताराचंद पारधी उपस्थित आहेत.

सदर तक्रार अर्जावरील दि. २३.११.२०२२ रोजी आदेशीत केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय वडधा हे त्यांच्या व्यक्तीगत खुलाश्यासह व्यक्तीश: उपस्थित असून ते दि.३०.०९.२०२० रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार निवृत्तीच्या कालावधीनंतर ४ वर्षाच्या आत कुठलीही प्रशासकीय स्तरावील कार्यवाही करणे शक्य असुन त्यानंतर कार्यवाही करण्याबाबत याआधिच मा. उच्च न्यायालय यांच्या अनेक निर्णयात अशी कार्यवाही करणाऱ्या प्राधिकरणां विरुध्द कठोर निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी दि. १४.११.२०१७ रोजी पारीत आदेशात मौजा देशपूर येथील म.ग्रा.रो. योजनंअंतर्गत सन २०१५-२०१६ कालावधीत केलेल्या आर्थिक कामाचा तपशिल मागीतलेला असून तो देण्यात आला नसल्यामुळे कलम १९(८) (ग) व २०(१) अन्वये शास्ती कारवाई का करण्यात येवू नये? यासंदर्भात आदेश देखील जारी करण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी आज सादर केलेल्या खुलाशात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०४.२०१७ रोजीच तक्रारकर्ता यांना मौजा देशपूर येथील म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत केलेल्या कामाच्या तपशीलासंबंधात एकूण ४०९/- रुपये शुल्क भरण्याबाबत सुचित केले होते व त्याबद्दलची पोच पावती त्यांनी वरील पत्र स्विकारल्याचे देखील आढळून येते. मात्र ही बाब तक्रारकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तसेच आयोगासमोर देखील सादर केली नसल्याचे नमुद केले आहे. तसेच अपीलार्थी यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशानंतर माहिती देण्याचे प्रयत्न केले असता तक्रारकर्ता श्री. बोरकर यांनी ती स्वीकारण्यास वारंवार नकार दिला असल्याचे देखील श्री. हुड यांनी त्यांच्या खुलाश्यात नमुद केलेले आहे. तसेच श्री. हुड हे सेवानिवृत्त होऊन ४ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असल्याची वस्तूस्थिती लक्षात घेता कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ही विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार श्री. पंढरी बोरघरे यांना विनामुल्य देण्याच्या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★ नागपूर ★

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २९.०८.२०२४**

**जा.क्र.**7243**दि.**------------
14 OCT 2024

E:\SA \तक्रार 29.08.2024\45-2019 बोरघरे.docx